# पुणे विद्यापीठ

महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ,
पुणे विद्यापीठ,
पुणे – ०७

दुरध्वनी क्र.
(०२०) २५६०१२६३

संदर्भ क्र. : ओएसडी /बीसीयुडी/१४

दि.१९ /०५ /२०१४

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक,
पुणे विद्यापीठ सलग्न महाविद्यालये
व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था.

विषय : विद्यापीठ संशोधन प्रकल्प योजना जिल्हानिहाय लेखे शिबीराबाबत ...

महोदय,

पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयामध्ये व मान्यता प्राप्त संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांच्या पहिल्या हप्त्याचे व २०१२–१३ मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांचे अंतिम एकुण हिशोब तपासणीसाठी केंद्रिय पद्धतीने लेखे स्विकारण्यासाठी जिल्हनिहाय शिबीर आयोजित करण्यात येत आहे. तरी सदर संलग्न महाविद्यालयांतील शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांनी दिलेल्या तारखांप्रमाणे उपस्थित रहावे. सदर शिबीरास महाविद्यालय व संस्था यांचा प्रतिनिधी म्हणून संबंधित शैक्षणिक व संशोधन समन्वयक (Academic & Research Coordinator) यांनीच उपस्थित रहावे. ते काही कारणास्थव उपलब्ध नसल्यास महाविद्यालयांतील संबंधित लिपिकाने उपस्थित रहावे. संशोधक प्राध्यापकांने उपस्थित रहाण्याची आवश्यकता नाही.

### अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्प २०१३–१४

| अ.क्र. | जिल्हा | ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक शहर व ग्रामीण | वाणिज्य विभाग, पुणे विद्यपीठ, पुणे – ०७ | ०९/०६/२०१४ | स. १०.०० ते सायं. ५.०० |
| २ | अहमदनगर शहर व ग्रामीण | | १०/०६/२०१४ | |
| ३ | पुणे ग्रामीण | | ११/०६/२०१४ | |
| ४ | पुणे शहर | | १२/०६/२०१४ | |
| ५ | पुणे शहर | | १३/०६/२०१४ | |

### अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्प २०१२–१३

| अ.क्र | जिल्हा | ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक व अहमदनगर | वाणिज्य विभाग, पुणे विद्यपीठ, पुणे – ०७ | १६/०६/२०१४ | स. १०.०० ते सायं. ५.०० |
| २ | पुणे ग्रामीण | | १७/०६/२०१४ | |
| ३ | पुणे शहर | | १८/०६/२०१४ | |
| ४ | पुणे शहर | | १९/०६/२०१४ | |

सदर शिबीरास येताना सोबत सन २०१२-१३ व २०१३-१४ ह्या कालावधीतील प्रकल्प मान्यता पत्र व प्रत्यक्षात अनुदान मिळाल्याचा चेक नंबर व रक्कम रुपये, लेखा प्रमाणपत्र (Audit Statement), मुळ देयके, Innovation - २०१४ चे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे. एकुण हिशोब सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांच्याकडून तपासून लेखा प्रमाणपत्रासह सादर करावा. उपकरणे, साधने यांची Stock Entry, पुस्तकांच्या ग्रंथालयातील नोंदीचा पुरावा व सर्व कागदपत्रांवर मा.प्राचार्यांची सही आवश्यक आहे. हिशोब सादर करताना विद्यापीठाने दिलेल्या नमुन्यात (Annexure I – VI) करण्यात यावा. तसेच सन २०१३-१४ मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्राध्यापकांनी प्रगती अहवाल (Progress Report) जमा करणे आवश्यक आहे व सन २०१२-१३ मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्राध्यापकांनी त्यांच्या संशोधन प्रकल्प अहवालाची (Research Project Report) ची एक प्रत Hard Bound Copy with Embossing स्वरुपात आणि एक Soft Copy ज़मा करणे आवश्यक आहे.

या नंतर पुन्हा २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये अनुदान मिळालेल्या संशोधन प्रकल्पांच्या हिशोब तपासणीसाठी केंद्रिय पद्धतीने लेखे शिबीर आयोजित केले जाणार नाही.

सदर संशोधन प्रकल्प व त्यावरील खर्चाचे हिशोब केंद्रिय लेखे शिबीरा दरम्यान जमा न झाल्यास सदर महाविद्यालय सन २०१४-२०१५ मध्ये दिल्या जाणाऱ्या नविन संशोधन प्रकल्पांच्या अनुदानास पात्र राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

Sd/-
डॉ. रविंद्र जायभाये
विशेष कार्याधिकारी, म. वि. वि. मं.